*2022 पर्यंत जिल्हयातील आदिवासी बांधवांना हक्काची घरे देणार – सुधीर मुनगंटीवार*
*आदिवासी विद्यार्थ्यांसाठी आयआयटी सोबत एमओयू करून रोजगार निर्मीतीची क्षमता निर्माण करण्यासाठी मिशन मंथन*
*पोंभुर्णा येथे शहीद बाबुराव शेडमाके यांच्या नावाने सभागृहाचे बांधकाम करणार*
*पोंभुर्णा येथे जागतीक मुलनिवासी गौरव दिन उत्साहात साजरा*.

==============================================================================

पर्यावरणाचे पर्यायाने वसुंधरेचे रक्षण करणा-या सात्वीक, प्रामाणिक आदिवासी समाज बांधवांच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, रोजगार, आरोग्य या मुलभूत गरजा पूर्ण करत त्यांच्या जीवनात प्रकाशाचा, विकासाचा सूर्य आणण्याची नितांत आवश्यकता आहे. 2022 च्या 9 ऑगस्ट अर्थात आदिवासी दिनापर्यंत चंद्रपूर जिल्हयातील प्रत्येक आदिवासी बांधवाला त्यांच्या हक्काचे घर उपलब्ध करण्यात येईल तसेच पोंभुर्णा येथे वीर बाबुराव शेडमाके यांच्या नावाने सभागृहाचे बांधकाम करण्यात येईल अशी घोषणा राज्याचे वित्तमंत्री तथा चंद्रपूर जिल्हयाचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली. 2024 मधील ऑलिम्पीक स्पर्धेत विजेतेपद पटकाविण्यासाठी मिशन शक्तीच्या माध्यामतुन तयारी सुरू झाली असून या स्पर्धेत पदक प्राप्त करणारा खेळाडू पदक स्विकारताना जय सेवा अशी गर्जना करेल, असेही ते यावेळी बोलताना म्हणाले.

दिनांक 9 ऑगस्ट रोजी पोंभुर्णा येथे गोंडीयन सामाजिक सहाय्यता कल्याण संस्था चंद्रपूर च्या माध्यमातुन आयोजित जागतीक मुलनिवासी गौरवदिन समारंभात ते बोलत होते. यावेळी मंचावर गोंडवाना महासभेचे प्रदेशाध्यक्ष मुरलीधर टेकाम, पोंभुर्णा पंचायत समितीच्या सभापती अलका आत्राम, पंचायत समिती सदस्य गंगाधर मडावी, सुधाकर कन्नाके, भाऊसाहेब टेकाम, डॉ. प्रशांत पेंदाम, गोंडीयन विचारवंत योगेश कोडापे आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

यावेळी बोलताना अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार पुढे म्हणाले, देशाला भुकमुक्त व भयमुकत करण्यासाठी गरीबी व विषमतेला चले जाव म्हणण्याचा हा दिवस आहे. देशाच्या संविधानात विषमता दूर करण्यासाठी अनेक उपाययोजना सुचविल्या आहेत. चंद्रपूर, गडचिरोली, नंदूरबार या आदिवासी बहुल जिल्हयांमध्ये टँकर ची आवश्यकता भासत नाही कारण तेथील आदिवासी बांधव वनांचे, वसुंधरेचे रक्षण करतो. मात्र आजही आदिवासी बांधवांना त्यांच्या मुलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी संघर्ष करावा लागतो. आदिवासींच्या हिताचे रक्षण करण्यासाठी संविधानात सर्वाधिक अनुच्छेद समाविष्ट आहेत. त्यादृष्टीने कायदे सुध्दा करण्यात आले आहेत, मात्र या कायद्यांची अंमलबजावणी गतीने झाली नाही. संविधानाने जरी आरक्षण दिले असले तरीही आमचा आदिवासी बांधव त्यांच्या कर्तृत्वाने, गुणांनी मोठे झाले आहे. त्यांची क्षमता विकसित करण्याची आवश्यकता आहे यासाठी मिशन शौर्य हा उपक्रम आपण राबविला. जगातील सर्वोच्च शिखर असलेल्या माऊंट एव्हरेस्टवर चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी तरूणांनी झेंडा फडकविला. त्यांना शासनामार्फत 25 लाख रूपयांची मदत करण्यात आली. मिशन सेवा च्या माध्यमातुन स्पर्धा परिक्षांची तयारी करण्यात येत आहे. येणा-या काळात जिल्हयातील आदिवासी तरूण, तरूणी आयएएस, आयपीएस सारख्या परिक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या आपण निश्चीतपणे बघू अशा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

आदिवासी विद्यार्थ्यांचे आयआयटी मध्ये प्रवेश घेण्याचे स्वप्न पूर्ण व्हावे यासाठी 100 विद्यार्थ्यांना मिशन मंथन च्या माध्यामतुन आयआयटी सोबत सामंजस्य करार करून त्यांना प्रशिक्षीत करण्यात येणार आहे. त्या माध्यमातुन जिल्हयातील आदिवासी विद्यार्थी रोजगार निर्मीतीची क्षमता घेवून इतरांना रोजगार देण्यासाठी सक्षम होणार आहे. हा देशातील पहिलाच प्रयोग ठरणार आहे. या भागात 25 लाख रू. किंमतीचे सहा गोटूलाचे बांधकाम आपण यापूर्वी मंजूर केले असून पोंभुर्णा येथे वीर बाबुराव शेडमाके यांच्या नावाने मोठे सभागृह बांधण्यात येईल. 2008 पासुन वसतीगृह मंजूर न करण्याबाबत शासनाचे धोरण ठरले होते. मात्र आदिवासी समाज बांधवांच्या मागणीच्या अनुषंगाने विशेष बाब म्हणून पोंभुर्णा आणि सावली या ठिकाणी आदिवासी मुला, मुलींसाठी वसतीगृह आपण मंजूर केले. या वसतीगृहाच्या उदघाटनासाठी आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांना आपण पाचारण करणार असल्याचे ते यावेळी बोलताना म्हणाले.

राज्याच्या विविध भागात आदिवासी समाजाच्या शूरविरांनी स्वातंत्र्य लढयात आपल्या प्राणांची आहूती दिली आहे. अशा सहा आदिवासी शूरविरांचे स्मारक त्यांच्या जन्मगावी उभारण्याचा निर्णय यावर्षी अर्थसंकल्पात मी जाहीर केला. त्यात घोट येथे बाबुराव शेडमाके यांचे स्मारक उभारण्यात येणार आहे. ही सहा स्मारके सर्व समाजांसाठी राष्ट्रभक्तीची भावना जागविणारी प्रेरणादायी स्मारके ठरणार आहेत. चंद्रपूर शहरात ज्युबिली हायस्कुल परिसरात वीर बाबुराव शेडमाके यांच्या नावाने भव्य स्टेडियम आपण उभारत आहोत. यासाठी निधी सुध्दा उपलब्ध झाला आहे. लवकरच या स्मारकाच्या बांधकामाला सुरूवात होणार आहे. 2 रूपये, 3 रूपये किलो किंमतीने धान्य उपलब्ध करण्याचा निर्णय आपण घेतला आहे, शंभर टक्के एलपीजी गॅस उपलब्ध करण्याचा निर्णय आपण घेतला आहे, संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना या योजनांच्या अनुदानात 600 रू. वरून 1000 रू. वाढ करण्याचा निर्णय आपण घेतला आहे. या निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी व आदिवासी समाजबांधवांना या निर्णयांचा लाभ व्हावा यासाठी समाजातील तरूण, तरूणींनी पाठपुरावा करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी बोलताना केले. महिला बचतगटांना ट्रॅक्टर चे वाटप, सिलाई मशीनचे वाटप आपण केले आहे. पोंभुर्णा येथे आदिवासी महिलांची कुक्कुटपालन संस्था आपण स्थापन केली. या संस्थेचा यशस्वी प्रवास अभिमानास्पद आहे. अशा पध्दतीची कंपनी राज्यातील पहिला प्रयोग ठरली आहे. आदिवासी समाज बांधवांच्या हितासाठी, कल्याणासाठी राज्य सरकारचा मंत्री म्हणून मी व माझे सरकार कटिबध्द असून आदिवासींच्या हिताच्या विरोधात कोणताही निर्णय घेतला जाणार नाही अशी ग्वाही त्यांनी यावेळी बोलताना दिली. पुढील तीन वर्षात अर्थात 2022 पर्यंत जिल्हयातील एकही आदिवासी बांधव हक्काच्या घराशिवाय राहणार नाही, यासाठी शबरी आवास योजना, पंतप्रधान आवास योजनेत घरांची संख्या वाढविण्यात आली आहे, असेही ते म्हणाले. जागतीक आदिवासी दिवस हा फक्त कार्यक्रम साजरा करण्याचे निमीत्त नसून पर्यावरणाचे रक्षण करणा-या आदिवासींच्या सन्मानाचा दिवस असल्याचे ते म्हणाले.

या कार्यक्रमाला जिल्हयातील आदिवासी समाजबांधवांची मोठया संख्येने उपस्थिती होती.